तरुण भारत

# बिट्स पिलानीतर्फे 'टेक एक्स्पो'

## अभियंता दिनानिमित्त प्रदर्शनाचे आयोजन, गोव्यातील दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग



**सांकवाळ : अभियंता दिनानिमित्त आयोजित 'टेक एक्स्पो'मध्ये प्रा. सुमन कुंडू, प्रा. विनायक नाईक व प्रा. श्रीनिवास कृष्णस्वामी यांच्यासमवेत बिट्स पिलानी गोवा कॅम्पस व गोव्यातील इतर शाळांतील विद्यार्थी.**

प्रतिनिधी
वास्को

बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसतर्फे अभियंता दिनानिमित्त 'टेक एक्स्पो २०२२'चे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनात गोव्यातील दहापेक्षा जास्त शाळांतील नववी ते बारावीपर्यंतच्या दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

अभियांत्रिकी विषयाची ओळख करून देणे, हे या टेकएक्स्पोचे उद्दिष्ट होते. बिट्स पिलानी येथील सेंटर फॉर टेक्निकल एज्युकेशन (सीटीई)मध्ये संगणक विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. विनायक नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचे विद्यार्थी अध्यक्ष आंचल मलानी व उपाध्यक्ष ध्रुव जोहरी यांच्या नेतृत्वाखाली सीटीईने हा कार्यक्रम बिट्स गोव्याच्या इलेक्ट्रॉनिक्स व रोबोटिक्स क्लब, एरोडायनॅमिक्स क्लब, एसएई बिट्स गोवा चॅप्टर, एसईडीएस–सेलेस्टिया व प्रोजेक्ट क्राटोस यासारख्या विविध तांत्रिक क्लबच्या सहकार्याने आयोजित केला होता.

प्रा. विनायक नाईक यांनी बिट्स कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी बिट्स आणि त्यांच्या तांत्रिक क्लबविषयी माहिती देण्यात आली. केमिकल इंजिनीअरिंग विभागाचे प्रमुख प्रा. श्रीनिवास कृष्णस्वामी यांनी विज्ञान व अभियांत्रिकी यातील संबंधाविषयी माहिती दिली. बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू यांनी अभियंता दिन व अभियांत्रिकी व्यवसायात उपलब्ध असलेल्या विविध संधींची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी साय–टेक क्वीझ, पेपर–प्लेन एक्टीव्हीटी व ऑटोनोमस ड्रोन बेस्ड् गेस्चर डिटेक्शनचा आनंद घेतला. टेकएक्स्पोमध्ये प्रदर्शनात मांडलेले प्रकल्प रोबोट्स, कार व ड्रोनपासून मार्स रोव्हर व श्लीरेन फोटोग्राफीचा समावेश होता. या उपकरणांना स्पर्श करण्याची व पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.

या टेकएक्स्पोमध्ये के. बी. हेडगेवार हायस्कूल, विद्याविकास अकादमी, आल्मेदा हायस्कूल, सेंट ॲण्ड्र्यू व शारदा मंदीर आदी शाळांनी भाग घेतला. सीटीई बीट्सच्या द्वितीय व तृतीय वर्षाच्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा संघ आहे. अशा कार्यक्रमांव्यतिरिक्त व्यावसायिकांना अभियांत्रिकी अभ्यासक्रमाविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येते. टेकएक्स्पो हे या संघाचे फार मोठे यश आहे.